शनिवार, दि. १७ सप्टेंबर,२०२२

आझादी का अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत मराठी विभाग आयोजित

**प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला**

**विषय –लोकलढ्यांचे लोकनायक : डॉ. एन. डी. पाटील**

**वक्ते – मा. प्रा. एकनाथ पाटील**

## अहवाल

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे कैवारी, कृतिशील विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याची महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना ओळख व्हावी, या उद्देशाने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

या उपक्रमातील सहावे व्याख्यान मा. प्रा. एकनाथ पाटील यांचे झाले. 'लोकलढ्याचे लोकनायक : प्रा. डॉ. एन. डी. पाटील' या विषयावर बोलताना मा. प्रा. एकनाथ पाटील म्हणाले, ''बहुजन समाजाच्या कल्याणाचा विचार करणारा कुणीच नेता आज महाराष्ट्रात शिल्लक नाही. स्वतंत्रोत्तर काळात ७५ वर्ष एन.डी. पाटील यांनी लोककल्याणासाठी आंदोलने, मोर्चे आणि चळवळी उभ्या केल्या. शेतकरी, कष्टकरी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी एन. डी. पाटील यांनी आपले अखंड आयुष्य खर्च केले. आयुष्यभर शेतकरी कामगार पक्षाच्या भूमिकेशी ठाम राहत अहिंसा आणि सत्य या दोन तत्त्वांचा आधार घेत प्रत्येक लोकलढा त्यांनी यशस्वी केला. अपवाद वगळता नेहमीच लोकहितासाठी ते सत्ताधाऱ्यांच्या, सरकारच्या विरोधात लढले. त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या जीवनाला निर्णायक वळण देणारे लोकनायक ठरले. ''

ते पुढे म्हणाले, ''शिक्षण आणि शेती हा एन. डी. पाटील यांच्या अस्थेचा विषय होता. शेती टिकली तर राष्ट्र टिकेल. शेतीमालाला किफायतशीर दर मिळाला तर शेतकरी तगेल. ही त्यांची भूमिका होती. शिक्षण ही राष्ट्राच्या भवितव्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. असे म्हणत शासनयंत्रणेला धारेवर धरून त्यांनी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवले. आजच्या तरुणांनी एन. डी. पाटील सरांचे कार्य नेटाने पुढे नेले पाहिजे. हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल.''

अध्यक्षीय मनोगतात ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. (आबा) पाटील म्हणाले, ''शोषितांना शोषणाच्या विळख्यातून मोकळा करणारा विचार प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी समाजाला दिला. सद्गुण, सद्विचार आणि सत्कार्य या त्रिसूत्रीत एन.डी. सरांचे व्यक्तीत्व बांधता येईल. सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांसाठी शासनव्यवस्थेबरोबर एनडींनी आयुष्यभर वैचारिक लढा दिला आहे.'' यावेळी प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले यांनी केली. पाहुण्याचा परिचय व स्वागत डॉ. तेजस चव्हाण, आभार प्रा. दिलीप कोने, सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन प्र. प्राचार्य टी. एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागाने केले.

सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मराठी विभागाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. तेजस चव्हाण यांनी केला. आभार प्रा. दिलीप कोने यांनी मानले; तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** 68

**क्षणचित्रे....**

**विषय** – लोकलढ्यांचे लोकनायक : डॉ. एन. डी. पाटील **वक्ते** – मा. प्रा. एकनाथ पाटील काही क्षणचित्रे










विभागप्रमुख
मराठी विभाग

प्र. प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)



प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.